# <u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग</u>

प्रकल्पाच्या पहिल्या ट्रेनचे पाहिले ४ डबे मुंबईत दाखल

उर्वरित ४ डबे लवकरच येणार

मुंबई, २ ऑगस्ट, २०२२- मुंबईकरांसाठी खुशखबर! कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्ग प्रकल्पाच्या पहिल्या ट्रेनचे पाहिले चार डबे मुंबईत आज पहाटे दाखल झाले.

हे डबे चार ट्रेलर्सवर आंध्र प्रदेशातील श्रीसिटी पासून १४०० किमी अंतर १३ दिवसात ओलांडून मुंबई शहरात पोचलेले आहेत.

आणखी चार डबे लवकरच मुंबईत पोचतील.

४२ टन वजनाचा प्रत्येक डबा खास प्रकारच्या ट्रेलरवरून आणण्यात आला. या ८-ऐक्सेल ट्रेलर्सना ६४ चाकं असतात.

आता या डब्यांची जुळवणी करून सारिपूत नगरातील तात्पुरत्या सुविधेमध्ये एक ट्रेन थाटली जाईल. येथेच चाचणी ट्रॅकसुद्धा उपलब्ध आहे. तात्पुरत्या सुविधेपासून मरोळ नाका मेट्रो स्थनका पर्यंतच्या ३ कि. मी. लांबीच्या ट्रॅकवर चाचण्या घेण्यात येतील. (समाप्त)

**For further information please contact :-**


Niti Tamse

8369727364/9664215544

niti.tamse@mmrcl.com

Afreen Shaikh

8655533926

<u>afreen.shaikh@mmrcl.com</u>